HCC/SEC/ADVT/2026 June 24, 2026

| **BSE Limited**<br>The Corporate Relationship Dept,<br>Phiroze Jeejeebhoy Towers,<br>Dalal Street,<br>Mumbai-400 001.<br>Scrip Code : 500185 | **National Stock Exchange of India Ltd.**<br>Exchange Plaza,<br>Bandra-Kurla Complex,<br>Bandra (East),<br>Mumbai-400 051.<br>Symbol : HCC |
|---|---|

Dear Sir / Madam,

**Sub : Newspaper Publication regarding the Special Window for transfer and dematerialisation of Physical Shares**

Please find enclosed copies of the Newspaper advertisements published today (i.e. June 24, 2026) in the Newspapers viz. Business Standard (in English) and Sakal (in Marathi), Mumbai editions, *inter-alia* informing about the Special Window for transfer and dematerialisation of Physical shares

We request you to kindly take the above on record.

Yours sincerely,
For **Hindustan Construction Company Ltd.**

NITESH KUMAR JHA

Digitally signed by NITESH KUMAR JHA
DN: c=IN, o=PERSONAL, title=1979, pseudonym=ebcd2c690280495281de1c520fcccf9f, 2.5.4.20=85a282acf1b74a6ba8d538e01089e6d1b58b675e59040a9af4e4f835f71cc335, postalCode=410210, st=Maharashtra, serialNumber=ea422f12d8f4e8778bf2857e9d6c0509df9788526f7246d5a89164fa23df53e6, cn=NITESH KUMAR JHA
Date: 2026.06.24 16:07:29 +05'30'

**Nitesh Kumar Jha**
**Company Secretary**

Encl.: As above

# NOTICE

## SPECIAL WINDOW - RE-LODGEMENT FOR TRANSFER AND DEMATERIALISATION (DEMAT) OF PHYSICAL SHARES

Pursuant to SEBI Circular No. HO/38/13/11(2)2026-MIRSD-POD/ 1/3750/2026 dated January 30, 2026, a Special Window has been opened from February 5, 2026 to February 4, 2027 only for re-lodgement of transfer deeds, which were originally lodged prior to the deadline of April 1, 2019 but were rejected/returned/not attended due to deficiency in the documents/ process/or otherwise and missed the extended timeline of March 31, 2021 for re-lodging their documents for transfer of securities.

While lodging requests under this special window for transfer of physical shares, one of the mandatory requirements is submission of original share certificates, as follows:

| Execution Date of Transfer Deed | Lodged for transfer before April 1, 2019? | Original Security Certificate Available? | Eligible to to lodge in the current window? |
|---|---|---|---|
| Before April 1, 2019 | No (it is fresh lodgement) | Yes | ✓ |
| | Yes (was rejected/ returned earlier) | Yes | ✓ |
| | Yes | No | x |
| | No | No | x |

Further, the following cases will also not be considered under this Special Window:

- Case(s) involving disputes between the transferor and transferee.
- Securities which have been transferred to the Investor Education and Protection Fund (IEPF).

Note: All shares re-lodged during this period will be processed through the transfer-cum-demat route, i.e., they will only be issued in dematerialized (demat) form after transfer and the same will be subject to a lock-in of one year from the date of registration of transfer.

For any further information / clarification in this regard, concerned Shareholders can get in touch with the Registrar & Transfer Agent (RTA) at address given below:

**MUFG Intime India Private Limited (RTA)**
C-101, 1st Floor, 247 Park,
Lal Bahadur Shastri Marg,
Vikhroli (West),
Mumbai – 400 083

For **Hindustan Construction Co. Ltd.**
Sd/-
**Nitesh Kumar Jha**
Company Secretary

Dated: June 24, 2026
Place: Mumbai

HCC

www.hccindia.com

**Hindustan Construction Co. Ltd.**
Registered Office: Hincon House, Lal Bahadur Shastri Marg, Vikhroli (West), Mumbai 400 083, India.
Tel: +91 22 2575 1000 Fax: +91 22 2577 7568
CIN: L45200MH1926PLC001228


**उद्धव ठाकरे रविवारी धाराशिवच्या दौऱ्यावर**

धाराशिव : शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे रविवारी (ता. २८) दुपारी चार वाजता धाराशिव दौऱ्यावर येत आहेत. खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या बंडखोरीनंतर ते काय भूमिका मांडणार, याकडे लक्ष लागले आहे. जिल्ह्यातील संघटनात्मक बांधणी मजबूत करण्याबाबत ते मार्गदर्शन करतील.

# प्रसिद्धीच्या मोहात... तरुणाईचे भविष्य धोक्यात

> **आजचा काळ** हा तंत्रज्ञानाचा आणि डिजिटल क्रांतीचा आहे; परंतु हे तंत्रज्ञान कसे वापरायचे याचे तारतम्य समाजात रुजविण्याची गरज आहे; अन्यथा अनर्थ ओढवू शकतात.

**सत्यजित तांबे**


चित्र : मनोज शिंदे

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), इंटरनेट आणि सोशल मीडिया यांनी दैनंदिन जीवनात मोठा बदल घडवला आहे. शिक्षण, नोकरी, व्यवसाय, शेती, आरोग्य अशा प्रत्येक क्षेत्रात एआयचा वापर वाढत आहे. काही सेकंदात माहिती मिळणे, फोटो-व्हिडिओ तयार करणे, पत्रव्यवहार करणे हे सर्व आता अगदी सोपे झाले आहे. मात्र यामागे एक गंभीर धोका दडलेला आहे, तो म्हणजे तंत्रज्ञानाचा गैरवापर.

अलीकडेच संगमनेरमध्ये एका २४ वर्षीय तरुणाच्या बाबतीत घडलेली घटना याचेच एक जिवंत उदाहरण. हा तरुण स्पर्धापरीक्षा देत होता आणि सरकारी नोकरी मिळवण्याचे त्याचे स्वप्न होते. आपल्या वाढदिवसानिमित्त काहीतरी वेगळे करण्याच्या विचारातून त्याने कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून बनावट शुभेच्छापत्र तयार केले. या शुभेच्छापत्रात देशाचे पंतप्रधान, राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या नावांचा वापर करून ते सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आले. त्याला वाटले, की यामुळे त्याला प्रसिद्धी मिळेल, मित्रांमध्ये चर्चा होईल आणि वाढदिवस लक्षात राहील. पण काही तासांच्या या प्रसिद्धीचा परिणाम अत्यंत गंभीर झाला. त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आणि पोलिस कारवाईला सामोरे जावे लागले. आता तरुणाच्या भविष्यासमोर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले.

ही घटना केवळ एका चुकीपुरती मर्यादित नाही. हा तरुण गुन्हेगारी प्रवृत्तीचा नव्हता, तर डिजिटल युगातील नवीन तंत्रज्ञानाविषयी गैरसमज करून बसलेला एक सर्वसामान्य युवक होता. एआय काय करू शकते, हे त्याला माहिती होते; पण त्याचा वापर कुठे थांबवावा, काय टाळावे याची जाणीव त्याला नव्हती.

आज मोबाईल आणि इंटरनेट प्रत्येकाच्या हातात आहे. एआय साधने काही क्षणांत फोटो आणि माहिती तयार करतात. विद्यार्थी अभ्यासासाठी, व्यावसायिक कामासाठी, शेतकरी शेतीविषयक माहिती मिळवण्यासाठी त्याचा वापर करत आहेत. हे सर्व सकारात्मक आहे. पण त्याचबरोबर एक मोठा प्रश्न निर्माण होत आहे, या तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर किती लोकांना करता येतो?

**सत्यासत्यतेचा गोंधळ**

पूर्वी इंटरनेटवर 'फेक न्यूज'ची समस्या होती. सोशल मीडियावर अफवा वेगाने पसरायच्या. इतकेच नव्हे; तर काही वर्षांपूर्वीही सोशल मीडियावर एखाद्या व्यक्तीचा फोटो एडिट करून चुकीच्या बातम्या पसरवण्याच्या घटना घडल्या होत्या, ज्यामुळे अनेकांना सामाजिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागला. आता एआयमुळे खरी आणि खोटी माहिती ओळखणे अधिक कठीण झाले आहे. काही मिनिटांत कोणाचाही फोटो बदलता येतो, आवाजाची नक्कल करता येते आणि खोटे व्हिडिओ तयार करून ते खरे असल्याचा आभास निर्माण करता येतो. याला 'डीपफेक' तंत्रज्ञान म्हणतात.

ही परिस्थिती सर्वसामान्यांसाठी धोकादायक आहे. कारण सोशल मीडियावर सहज उपलब्ध असलेली माहिती वापरून कोणाच्याही नावाने खोटी प्रतिमा तयार केली जाऊ शकते. एखाद्या विद्यार्थ्याचा, शिक्षकाचा, अधिकाऱ्याचा किंवा राजकीय व्यक्तीचा फोटो वापरून खोटी बातमी तयार झाल्यास त्याच्या प्रतिष्ठेला मोठा धोका निर्माण होतो.

एआयचा परिणाम केवळ वैयक्तिक आयुष्यापुरता मर्यादित नाही. तो शिक्षण, नोकरी, अर्थव्यवस्था आणि लोकशाहीवरही परिणाम करू शकतो. निवडणुकांच्या काळात खोटी माहिती पसरवण्यासाठी एआयचा गैरवापर होण्याची शक्यता असते. ऑनलाइन फसवणूक, बनावट कॉल आणि आर्थिक गुन्हेही वाढत आहेत.

'नीट' पुनर्परीक्षेच्या पार्श्वभूमीवर परीक्षाप्रक्रियेतील पारदर्शकता आणि गैरप्रकार रोखण्यासाठी केंद्र सरकारने 'टेलिग्राम'सारख्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर काही काळासाठी बंदी घातली गेली. प्रश्नपत्रिका लीक होणे, अफवा पसरवणे आणि डिजिटल माध्यमांचा गैरवापर टाळण्यासाठी विशेष नियंत्रण ठेवले जात असल्याचे स्पष्ट होत आहे. ही परिस्थिती दाखवते, की डिजिटल जगात माहिती तपासणे किती आवश्यक झाले आहे. प्रत्येक गोष्ट खरी मानण्यापूर्वी तिची शहानिशा करणे गरजेचे आहे.

तरीही हे लक्षात घ्यायला हवे, की एआय धोकादायक नाही. उलट ते अत्यंत उपयुक्त साधन आहे. प्रश्न तंत्रज्ञानाचा नाही, तर त्याच्या वापराचा आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये संगणक शिक्षण दिले जाते; पण एआयचा जबाबदारीने वापर, गोपनीयतेचे नियम, कॉपीराइट कायदे आणि सायबर गुन्ह्यांची माहिती यावर फारशी चर्चा होत नाही. हीच मोठी उणीव आहे. त्यामुळेच गरज आहे 'एआय साक्षरतेची' आणि 'डिजिटल साक्षरतेची'. जसे वाहन चालवताना वाहतुकीचे नियम शिकावे लागतात, तसेच एआय वापरताना त्याचे नियम आणि मर्यादा समजून घेणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे आणि सरकार यांनी यावर विशेष लक्ष द्यायला हवे. आजची तरुणाई ऑनलाईन शॉपिंग, गेमिंग, ट्रेडिंग आणि सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात सक्रिय आहे. मात्र याच माध्यमातून फसवणूक, सायबर गुन्हे आणि आर्थिक नुकसान होण्याच्या घटना वाढत आहेत. रोज अनेक लोक ऑनलाइन फसवणुकीचे शिकार होत आहेत. त्यामुळे युवकांना सुरुवातीपासूनच डिजिटल सुरक्षिततेचे शिक्षण देणे आवश्यक आहे.

तंत्रज्ञान वेगाने पुढे जात आहे, पण त्याचा योग्य वापर शिकण्याचा वेग कमी आहे. ही दरी भरून काढली नाही तर भविष्यात अशा अनेक घटना घडू शकतात. एआय एक साधन आहे. ते कसे वापरायचे हे पूर्णपणे आपल्यावर अवलंबून आहे. तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी मानवी विचार, विवेक आणि जबाबदारी यांची जागा ते कधीच घेऊ शकत नाही. त्यामुळे प्रत्येकाने डिजिटल जगात पाऊल टाकताना अधिक जागरूक आणि जबाबदार राहणे हीच आजची खरी गरज आहे.

**(लेखक विधान परिषदेतील आमदार आहेत.)**


जासईमधील आंदोलनादरम्यान लोकनेते दि. बा. पाटील यांच्यासोबत ज्येष्ठ कार्यकर्त्या भारती पोवार. (संग्रहित छायाचित्र)

# लोकनेते दि. बा. पाटील... लोकचळवळीचा धगधगता अंगार



> **प्रकल्पग्रस्तांच्या हक्कांसाठी** आयुष्यभर लढणारे लोकनेते दि. बा. पाटील यांचा आज स्मृतिदिन. या निमित्ताने ज्येष्ठ कार्यकर्त्या **भारती पोवार** यांनी जासई आंदोलनाच्या आठवणींना उजाळा देत दिबांच्या नेतृत्वाची, त्यागाची आणि संघर्षाच्या वारशाची आठवण करून दिली.

**सुजित गायकवाड**

महाराष्ट्राच्या जनआंदोलनांच्या इतिहासाबाबत बोलताना 'प्रकल्पग्रस्त' हा शब्द उच्चारला की डोळ्यांसमोर येतात ते लोकनेते दि. बा. पाटील. आज २४ जून दि. बा. पाटील यांचा स्मृतिदिन. मात्र या दिवशी केवळ त्यांच्या प्रतिमेला हार अर्पण करायचा की त्यांच्या विचारांचा गळा घोटणाऱ्या व्यवस्थेला जाब विचारायचा, असा प्रश्न पडावा अशी परिस्थिती आहे... कोल्हापूरच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या भारती पोवार यांनी ४२ वर्षांपूर्वीच्या जासईच्या आंदोलनाच्या आठवणींना यानिमित्त उजाळा दिला.

''१९८४ चा तो काळ होता. उरणच्या जासईमध्ये भूमिपुत्रांनी तेव्हा आपल्या जमिनी वाचवण्यासाठी लढा उभारला. त्यांचा लढा केवळ जमिनीसाठीचा नव्हता; तर तो स्वाभिमानाचा आणि अस्तित्वाचा होता. आजचे राजकारण सत्तेसाठी आणि स्वार्थासाठी कोणत्याही थराला जाणारे आहे. अशा काळात दि. बा. पाटलांचे व्यक्तिमत्त्व किती उत्तुंग होते, हे पाहणे महत्त्वाचे ठरते. ज्यांना मुख्यमंत्रिपदाच्या ऑफर होत्या, मंत्रिपदे ज्यांच्या पायाशी लोळण घेत होती अशा माणसाने सत्तेला लाथ मारून 'माझ्या १२ गावांतील एक इंचही जमीन शेतकऱ्यांच्या न्यायाशिवाय देणार नाही,' असा बाणा दाखवला. आजचा एकवेळचा आमदारही कोट्यवधींची माया गोळा करतो, मात्र तिथे दि. बा. पाटलांचे आयुष्य कार्यकर्त्यांनी फुलवलेल्या साध्या घरात गेले. हा त्याग आजच्या तथाकथित नेतृत्वाला समजणे अशक्य आहे,'' असे भारती पोवार यांनी नमूद केले.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव मिळावे, ही भूमिपुत्रांची आग्रही मागणी आहे. मात्र त्याबाबत सरकारची चालढकल होत असल्यासारखे चित्र आहे. सरकार 'नाव देतो' असे सांगून केवळ वेळ मारून नेत असल्याची भावना भूमिपुत्रांमध्ये निर्माण झाली आहे. सरकार दि. बा. पाटलांच्या नावाचा वापर केवळ आंदोलने शांत करण्यासाठी आणि निवडणुकांपर्यंत भूमिपुत्रांना चुचकारण्यासाठी करीत आहे, ही एक घोर फसवणूक आहे, असे परखड मतही पोवार यांनी मांडले.

भारती पोवार अत्यंत टोकदारपणे मत मांडताना म्हणतात, ''१९८४मध्ये जेव्हा पाच हुतात्मे झाले तेव्हा दि. बा. पाटील हे विरोधी पक्षनेते होते. आज तशी ताकद का उरली नाही? कारण आजच्या आंदोलनात राजकीय पक्ष घुसले आहेत आणि आंदोलनाचे रूपांतर कंत्राटदारीत झाले आहे. दि. बा. पाटलांसारखा नेता आज असता तर सरकारला एका क्षणात नमते घ्यावे लागले असते; पण दुर्दैवाने आजच्या तरुणांना आंदोलनाचे बाळकडू देण्यापेक्षा त्यांना सत्तेच्या लाभाचे आमिष दाखवले जात आहे. जासईच्या गोळीबारात काही जण हुतात्मा झाले; पण दि. बा. पाटील झुकले नाहीत. आताच्या काळात सरकार आंदोलकांना वेगळ्या प्रकारे दडपते. एक तर आंदोलनकर्त्यांसारखेच वागायचे, नाटक करायचे. आजही तेच तंत्र वापरले जात आहे. आंदोलनाची धार बोथट केली जात आहे. केंद्राने आणि राज्याने मान्यता देऊनही नवी मुंबई विमानतळाला दिबांचे नाव न मिळणे, हे त्या सरकारच्या मानसिकतेचे लक्षण आहे, ज्यांना दि. बा. पाटील नको आहेत. लोकशाही जिवंत ठेवायची असेल, तर आंदोलनाचा तो जुना आत्मा पुन्हा जागृत करावाच लागेल.''

## महामुंबईत सुखसरी बरसल्या

पान १ वरून

शहर परिसरात आज सकाळी ८ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार, नायर रुग्णालय ७८.९६ मिमी, एन. एम. जोशी मार्ग महापालिका शाळा लोअर परेल ७४.४ मिमी, एफ-दक्षिण विभाग कार्यालय ७२.६३ मिमी पावसाची नोंद झाली. पश्चिम उपनगरे परिसरात मालाड डेपो ६१.८ मिमी, मालवणी फायर स्टेशन ५२.२ मिमी, तर पूर्व उपनगरे परिसरात महाराष्ट्रनगर शाळा मानखुर्द ५१.२ मिमी, पसपोली पवई महापालिका शाळा ३७.४ मिमी पावसाची नोंद झाली. रात्री ७ ते ८ या एका तासात बी विभाग कार्यालयाच्या परिसरात तब्बल ५४ मिमी पावसाची नोंद झाली. त्याखालोखाल मलबार हिल येथे २८ मिमी आणि पालिकेच्या मुख्यालय परिसरात २२ मिमी पाऊस पडला. पूर्व आणि पश्चिम उपनगरांमध्ये मात्र या काळात हलका पाऊस सुरू होता. दरम्यान, दुपारी लोअर परेल आणि भायखळा परिसरात जोरदार सरी कोसळल्यामुळे काही काळ सखल भागात पाणी साचण्याची भीती निर्माण झाली होती. मात्र, पालिकेच्या तत्परतेमुळे वाहतूक सुरळीत राहिली. तसेच रेल्वे वाहतूक आणि भुयारी मार्ग आज पूर्णपणे सामान्य होते.

**कोकण व्यापला; विदर्भातही प्रवेश**

**पुणे :** मॉन्सूनने मंगळवारी संपूर्ण कोकण विभाग व्यापला. दुसरीकडे मराठवाड्याचा बहुतांश भाग व्यापत मोसमी पावसाने विदर्भातही प्रवेश केला मध्य महाराष्ट्रातील नाशिक, मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर आणि विदर्भातील वर्ध्यापर्यंत मॉन्सूनने मजल मारली. नाशिकमध्येही दुपारी एक ते दीड तास जोरदार पाऊस कोसळला. भुसावळला पावसाबरोबर विजाही कोसळल्या. वीज कोसळून जिल्ह्यात तिघांचा मृत्यू झाला. मॉन्सून आता राज्यातील चारही हवामानशास्त्रीय उपविभागांमध्ये पोचला असून, त्याने मंगळवारी तेलंगण, ओडिशाच्या उर्वरित भागांसह छत्तीसगड, झारखंड आणि बिहारचा बहुतांश भाग व्यापला. मॉन्सूनच्या प्रगतीची उत्तरसीमा सध्या डहाणू, वर्धा, रायपूर, डाल्टनगंज, मोतीहारी येथून जात आहे. 'आयएमडी'च्या अंदाजानुसार, कोकण आणि गोव्यात २७ ते २९ जूनदरम्यान; तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात २४ ते २६ जूनदरम्यान काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे.

## 'पाकिस्तानातील कायदे भारतात लागू करणार का?'

पान १ वरून

होती. लक्षवेधी मांडल्याबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी त्याला आक्षेप घेत ही लक्षवेधी मान्य कशी करण्यात आली, असा सवाल केला. लक्षवेधी सूचनेत कोणते निकष लावले जातात, ही लक्षवेधी त्या निकषांमध्ये बसते का, असे सवाल केले. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी त्यावर स्पष्टीकरण देत, हा विषय केवळ तिहेरी तलाकचा नसून महिलांवरील अत्याचाराचा आहे. तसेच हा विषय संपूर्ण राज्याचा असल्याचे स्पष्ट केले. त्याचबरोबर बहुपत्नीकत्वामुळे महिलांवर अन्याय होत असल्याचा मुद्दा अध्यक्षांनी स्पष्ट केला. तिहेरी तलाक हा विषय केंद्र सरकारच्या अखत्यारीत असल्याचे काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांनी नमूद केले. विरोधकांनी लक्षवेधी मांडण्याच्या निकषावरून सभागृहात गोंधळ घालण्यास सुरुवात केली. या गोंधळातच देवयानी फरांदे यांनी ही लक्षवेधी मांडली. त्यावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) सदस्या सना मलिक यांनी बहुपत्नीकत्व केवळ मुस्लिम समाजातच बहुपत्नीकत्वाची प्रथा आहे का, असा सवाल केला. त्याचबरोबर अन्य समाजातील महिलांवर अन्याय होत नाहीत का, असे सवाल करीत महायुती सरकारला घरचा आहेर दिला.

गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी यावर उत्तर देण्याचा प्रयत्न केला; मात्र सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या सदस्यांनी सभागृहात गोंधळ घालण्यास सुरुवात केली. याच गोंधळात मंत्र्यांनी उत्तर देत ही लक्षवेधी कोणत्याही एका धर्माची नसून सर्व धर्मांतील महिलांचा आम्ही सन्मानच करतो, असे स्पष्ट केले.

## एसटी वेतन, भत्त्यांत वाढ

पान १ वरून

मंत्री सरनाईक यांनी ही माहिती दिली. वाढीमुळे महामंडळावर दरमहा ४५ कोटी रुपयांचा भार पडणार आहे. विविध भत्त्यांची थकबाकी आणि अन्य देणी मिळून ५,६४९ कोटी रुपयांची देयके अदा करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सरनाईक यांनी सांगितले. महागाई भत्ता ५३ टक्क्यांवरून ५८ टक्के, घरभाडे भत्ता ८, १६ आणि २४ टक्क्यांवरून १०, २०, ३० टक्के, वार्षिक वेतनवाढीचा दर २ टक्क्यांवरून ३ टक्के होणार आहे.

## न्यायालयाचा बनावट आदेश!

पान १ वरून

यांच्या व्हॉट्सॲपवर न्यायालयाने पाडकामाला स्थगिती दिल्याच्या बनावट ऑर्डरची पीडीएफ फाइल पाठवली. पालिकेने न्यायालयाच्या मूळ रेकॉर्डची पडताळणी केली असता, कोर्टाने असा कोणताही स्थगिती आदेश दिलाच नसल्याचे उघड झाले. महापालिका आयुक्तांना ज्या नंबरवरून कोर्टाची बनावट ऑर्डर कॉपी पाठवण्यात आली तो सागर नाईक या व्यक्तीच्या नावाने असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे तो नंबर नेमका कोणाचा, कोणी वापरला आणि या संपूर्ण बनावट आदेशाच्या षड्यंत्रामागे नेमका कोणाचा हात आहे, याचा पोलिस शोध घेत आहेत.

## 'बदली' मंत्र्यांवरून प्रचंड गदारोळ

पान १ वरून

असले, तरी आपल्याकडे दोन सभागृहे असल्याने अनेकदा मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांना दोन्ही सभागृहांत उपस्थित राहावे लागते. पर्यायाने त्यांच्या खात्याच्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी अन्य मंत्र्यांना प्राधिकृत करावे लागते, असे त्यांनी सांगितले. त्यावर विरोधकांचे समाधान न झाल्याने त्यांनी गोंधळ घालण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी सभात्याग केला.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी त्यावर आक्षेप घेतला. 'अशा प्रकारे कामकाज चालणार असेल, तर सभागृहात कशाला बसायचे,' असा सवाल करीत सभात्याग केला. त्यानंतर सर्वच विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सरकारच्या निषेधाच्या घोषणा दिल्या. त्यानंतर विधानसभेत गोंधळ करत सभात्याग केला.

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**
**शंकर शेठ रोड, स्वारगेट, पुणे-४११०३७**

**ई निविदा सुचना**

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या मालकीच्या विविध व्यापारी संकुलांतील जागा, दुकांनासाठी गाळे, कर्मचारी कॅन्टीनसाठी मोकळी जमीन (डेक्कन कमर्शिअल इमारत-०३, हडपसर कमर्शिअल इमारत-१७, मार्केटयार्ड कमर्शिअल इमारत-०६, न. ता. वाडी कमर्शिअल इमारत-०२, स्वारगेट कमर्शिअल इमारत-०१ व इतर ठिकाण-१४) अशा एकूण ४३ जागा सरकारी कार्यालय, बँक, शैक्षणिक संस्था, छोटे व्यावसायिक इत्यादींना ३३ महिने- ३३ महिने- ३३ महिने कालावधीसाठी लीव्ह अँन्ड लायसेन्सवर दयावयाचे असून www.mahatenders.gov.in या पोर्टलवर निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

**विक्री व स्वीकृती कालावधी दि. २४/०६/२०२६ ते दि. १४/०७/२०२६ दु. २.३० वा.**
**तांत्रिक निविदा उघडण्याची प्रक्रिया दि. १६/०७/२०२६ दु. ३.०० वा.**

**निविदा क्र. ०१ ते ४३ मालमत्ता विभाग २०२६**
**दिनांक :- २४/०६/२०२६**

(महेश आव्हाड, भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

**वि. न्यायाधीश, कौटुबिंक न्यायालय,अकोला यांचे न्यायालय**

**जाहीर नोटीस**

ए. पि.नं. ३४/२०२६
सौ. शिवाली विरुध्द रोहीत
चौ.ता २३/७/२०२६

अर्जदार : **सौ. शिवाली रोहीत कदम**
वय- ३८ वर्ष, धंदा- नोकरी
रा. व्दारा सतिश केनकर, बी २, माँ वैष्णवी रेसिडेन्सी, दामले रोड, अकोला.

... विरुध्द

गैरअर्जदार कं. २ : **रोहीत रमेश कदम**
वय- ४० वर्ष, धंदा- नोकरी
रा. एच. आर. १३०३, व्हॅलीशिल्प सोसायटी, सेक्टर ३६ खारघर, नवी मुंबई.

ज्याआर्थी अर्जदार यांनी या **हिंदू विवाह अधिनियचे कलम १३. (1) (ia) (ib) अन्वये घटस्फोटाचा आदेश करण्याकरिता या न्यायालयात अर्ज केला आहे**. त्याअर्थी, याव्दारे तुम्हाला फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही सदर अर्जाविरूध्द कारण दाखवण्याकरिता दिनांक २३/७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात व्यक्तिगत किंवा रीतसर निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर व्हावे; तसे न केल्यास उक्त याचिकेची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल. जर चौकशी तारीख २३/७/२०२६ पर्यंत कोणाचेही काही आक्षेप आले नाही तर कुणाचेही काही आक्षेप नाही असे समजुन पुढील आदेश पारीत केल्या जाईल असे सर्वांना या जाहीर नोटिशीव्दारे सूचित करण्यात येत आहे.
आज दिनांक १७/६/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिली.

(शिक्का)

आदेशानुसार...
सही/-
प्र. प्रबंधक,
कौटुंबिक न्यायालय, अकोला.

**fbl fermenta**

कॉपोरेट आयडेन्टिफिकेशन नंबर : L99999MH1951PLC008485
नोंदणीकृत कार्यालय : ए-१५०१, ठाणे वन, 'डीआयएल' कॉम्प्लेक्स, घोडबंदर रोड, माजिवाडा, ठाणे (पश्चिम) - ४०० ६१०, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी: +९१-२२-६७९८ ०८०० / ८८८
ई-मेल: info@fermentabiotech.com • वेबसाईट: www.fermentabiotech.com

**भौतिक समभागांच्या हस्तांतरण आणि डीमटेरियलायझेशनसाठी विशेष खिडकी**

कृपया नोंद घ्यावी की, सेबीच्या परिपत्रक क्र. एचओ/३८/१३/११(२)२०२६-एमआयआरएसडी-पीओडी/आय/३७५०/२०२६ दिनांकीत ३० जानेवारी, २०२६ **(सेबी परिपत्रक)** नुसार, भौतिक समभागांच्या हस्तांतरण आणि डीमटेरियलायझेशन **('डीमॅट')** साठी ०५ फेब्रुवारी, २०२६ ते ०४ फेब्रुवारी, २०२७ पर्यंत एक वर्षाच्या कालावधीसाठी एक विशेष खिडकी उघडण्यात आली आहे. ही सुविधा फर्मेंटा बायोटेक लिमिटेड **('कंपनी')** च्या त्या भागधारकांना उपलब्ध असेल ज्यांनी १ एप्रिल २०१९ पूर्वी समभाग विकले/खरेदी केले होते; आणि (१) हस्तांतरणासाठी समभाग दाखल केले नव्हते; किंवा (२) हस्तांतरणासाठी समभाग दाखल केले होते परंतु ते नाकारले गेले/परत केले गेले/कागदपत्रांमध्ये/ प्रक्रियेत/अन्यथा कमतरता असल्यामुळे स्वीकारले गेले नाहीत.

१ एप्रिल २०१९ पूर्वी अंमलात आणलेल्या हस्तांतरण करारांबाबत वरील खिडकीच्या लागू होण्याच्या स्पष्टतेसाठी, कृपया खालील तक्ता पाहा:

| १ एप्रिल २०१९ पूर्वी हस्तांतरणासाठी अर्ज केला होता का? | भागधारकांकडे मूळ भाग प्रमाणपत्र उपलब्ध आहे का? | या विशेष खिडकीत दाखल होण्यास पात्र आहात का? |
|---|---|---|
| नाही (ही नवीन नोंद आहे.) | होय | होय (सेबी परिपत्रकात नमूद केलेल्या अटींच्या अधीन) |
| होय (पण ते आधी नाकारण्यात आले/परत करण्यात आले) | होय | |
| होय (दाखल केला होता) | नाही | नाही |
| नाही (दाखल केला नव्हता) | नाही | नाही |

मूळ समभाग प्रमाणपत्रांसह हस्तांतरण करार आणि इतर सहाय्यक कागदपत्रांसह असलेल्या विनंत्या केवळ विशेष खिडकी अंतर्गत विचारात घेतल्या जातील. अशा प्रकारे हस्तांतरित केलेले समभाग केवळ डीमॅट पद्धतीने हस्तांतरणकर्त्याकडे अनिवार्यपणे जमा केले जातील आणि हस्तांतरण नोंदणीच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीसाठी लॉक-इन अंतर्गत असतील. सदर लॉक-इन कालावधी दरम्यान असे समभाग हस्तांतरित/धारणाधिकार चिन्हांकित/तारण ठेवले जाणार नाहीत.

सेबीचे परिपत्रक कंपनीच्या https://fermentabiotech.com/investor-service-requests.php या वेबसाइटवर देखील उपलब्ध आहे, ज्याचा संदर्भ घेता येईल.

या विशेष खिडकीचा लाभ घेऊ इच्छिणारे गुंतवणूकदार कंपनीच्या रजिस्ट्रार अँण्ड ट्रान्सफर एजंट, **एमयुएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड** (पूर्वी लिंक इनटाईम इंडिया प्रा. लि. म्हणून ओळखले जाणारे), यांच्याशी संपर्क साधू शकतात, त्यांचा पत्ता सी-१०१, एम्बेसी २४७, एल.बी.एस मार्ग, विक्रोळी पश्चिम, मुंबई - ४०००८३ असा आहे.

दिनांक : जून २४, २०२६
स्थळ : ठाणे

फर्मेंटा बायोटेक लिमिटेड करिता
सही/-
वरदविनायक खांबेटे
कंपनी सचिव आणि कायदा प्रमुख

FBL/98/PREM ASSOCIATES-MAR

**क्रिसिल लिमिटेड** Crisil a company of S&P Global

**नोंदणीकृत कार्यालय :** लाईटब्रीज आयटी पार्क, साकी विहार रोड, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०० ०७२
**CIN :** L67120MH1987PLC042363
**दूरध्वनी :** +91-22-6137 3000
**संकेतस्थळ :** www.crisil.com **ई-मेल :** investors@crisil.com

याद्वारे सूचना देण्यात येते की, सेबी परिपत्रक HO/38/13/11(2)2026-MIRSD-POD/I/3750/2026 दिनांक ३० जानेवारी २०२६ **(सेबी परिपत्रक)** नुसार, ०१ एप्रिल २०१९पूर्वी प्रत्यक्ष सिक्युरिटिज ज्या विक्री/खरेदी करण्यात आल्या होत्या त्यांच्या डीमटेरिअलायजेशन आणि हस्तांतरणाबाबत भागधारकांसाठी ५ फेब्रुवारी २०२६ पासून ते ४ फेब्रुवारी २०२७ पर्यंत **('नमूद कालावधी')** १ (एक) वर्षाच्या कालावधीसाठी विशेष खिडकी उघडण्यात आलेली आहे. कागदपत्रांमधील त्रुटी/प्रक्रिया/किंवा इतर कारणांमुळे नाकारण्यात आलेल्या/परत पाठविलेल्या/पोहोच न झालेल्या हस्तांतरण विनंत्यासाठी ही विशेष खिडकी उपलब्ध आहे. पात्र भागधारक मूळ हस्तांतरण कागदपत्रे किंवा राहीलेले तपशील कफिन टेक्नॉलॉजिज लिमिटेड, आमचे निबंधक आणि भाग हस्तांतरण प्रतिनिधी (RTA) यांना कफिन टेक्नॉलॉजिज लिमिटेड, युनिट क्रिसिल लिमिटेड, ३०१, दि सेंट्रीयम, ३ रा मजला, ५७, लाल बहादूर शास्त्री रोड, नवपाडा, कुर्ला (पश्चिम), मुंबई - ४०० ०७०, महाराष्ट्र, भारत येथे सादर करू शकतील. त्याचबरोबर कोणत्याही शंकासमाधानासाठी भागधारक einward.ris@kfintech.com येथे लिहू शकतील किंवा १८०० ३०९४ ००१ वर कॉल करू शकतील. या नमूद कालावधीदरम्यान, हस्तांतरणासाठी पुन्हा दाखल केलेले भाग फक्त डीमटेरिअलाईज्ड (डिमॅट) स्वरूपात जारी केले जातील आणि हस्तांतरण नोंदणीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीसाठी लॉकइन अंतर्गत असतील. लॉकइन कालावधीदरम्यान अशा सिक्युरिटिजचे हस्तांतरण/लीन-मार्कड/तारण ठेवण्यात येणार नाहीत.

**केवायसीचे अद्ययावतीकरण आणि डिमॅट स्वरूपामध्ये प्रत्यक्ष भागांचे रुपांतरण**

भागधारक जे प्रत्यक्ष स्वरूपामध्ये भागधारण करीत आहेत त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांचे केवायसी अद्ययावत करावेत आणि त्याचबरोबर विनंती करण्यात येते की, त्यांचे प्रत्यक्ष भाग प्रमाणपत्र डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात (इलेक्ट्रॉनिक) रूपांतरीत करावे. त्याचबरोबर भागधारकांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या दावा न केलेल्या लाभांश रकमेचा दावा करावा अन्यथा ती भागांवर असलेल्या वेळेसह सात वर्षांची मुदत संपल्यानंतर गुंतवणुकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरणाकडे (IEPFA) हस्तांतरीत करण्यात येईल.

ठिकाणः मुंबई
दिनांक : २४ जून २०२६

क्रिसिल लिमिटेडकरिता
सही/-
मिनल भोसले
कंपनी सचिव
(ACS 12999)

**NOTICE**

**SPECIAL WINDOW - RE-LODGEMENT FOR TRANSFER AND DEMATERIALISATION (DEMAT) OF PHYSICAL SHARES**

Pursuant to SEBI Circular No. HO/38/13/11(2)2026-MIRSD-POD/ 1/3750/2026 dated January 30, 2026, a Special Window has been opened from February 5, 2026 to February 4, 2027 only for re-lodgement of transfer deeds, which were originally lodged prior to the deadline of April 1, 2019 but were rejected/returned/not attended due to deficiency in the documents/ process/or otherwise and missed the extended timeline of March 31, 2021 for re-lodging their documents for transfer of securities.

While lodging requests under this special window for transfer of physical shares, one of the mandatory requirements is submission of original share certificates, as follows:

| Execution Date of Transfer Deed | Lodged for transfer before April 1, 2019? | Original Security Certificate Available? | Eligible to to lodge in the current window? |
|---|---|---|---|
| Before April 1, 2019 | No (it is fresh lodgement) | Yes | ✓ |
| | Yes (was rejected/ returned earlier) | Yes | ✓ |
| | Yes | No | x |
| | No | No | x |

Further, the following cases will also not be considered under this Special Window:
- Case(s) involving disputes between the transferor and transferee.
- Securities which have been transferred to the Investor Education and Protection Fund (IEPF).

Note: All shares re-lodged during this period will be processed through the transfer-cum-demat route, i.e., they will only be issued in dematerialized (demat) form after transfer and the same will be subject to a lock-in of one year from the date of registration of transfer.

For any further information / clarification in this regard, concerned Shareholders can get in touch with the Registrar & Transfer Agent (RTA) at address given below:

**MUFG Intime India Private Limited (RTA)**
C-101, 1st Floor, 247 Park,
Lal Bahadur Shastri Marg,
Vikhroli (West),
Mumbai – 400 083

Dated: June 24, 2026
Place: Mumbai

For **Hindustan Construction Co. Ltd.**
Sd/-
**Nitesh Kumar Jha**
Company Secretary

HCC

www.hccindia.com

**Hindustan Construction Co. Ltd.**
Registered Office: Hincon House, Lal Bahadur Shastri Marg, Vikhroli (West), Mumbai 400 083, India.
Tel: +91 22 2575 1000 Fax: +91 22 2577 7568
CIN: L45200MH1926PLC001228